पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिति**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०९/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पहिली सभा (विशेष सभा) सोमवार दिनांक **१४/०९/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा. अभिषेक कृष्णा, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पी.एम.पी.एम.एल. पुणे** व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.जावेद रमजान शेख
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.जगदीश शेट्टी
४. मा.अड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
६. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.फुंदे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बोदाडे - प्रशासन अधिकारी, मा.लावंड – कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडणेसाठी कामाकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती )

----------

**मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पी.एम.पी.एम.एल. पुणे (पिठासीन प्राधिकारी)** - सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

**मा.नगरसचिव -** विषय क्र.१ - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सभापतीची नेमणूक करणे.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदासाठी नेमणूक करणेकामी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| **०१** | **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** | **मा.ननवरे जितेंद्र बाबा** | **मा.ओव्हाळ शेखर अशोक** |

( मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्त केले. मा.पिठासीन प्राधिकारी यांनी त्याची छाननी केली )

**मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पी.एम.पी.एम.एल. पुणे (पिठासीन प्राधिकारी)** - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढील प्रमाणे आहे.

**१) मा.मासुळकर समीर मोरेश्वर**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन प्राधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल. अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

(मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दुपारी **२.०५** ते दुपारी **२.२०** हा १५ मिनिटांचा अवधी संपला.)

**मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पी.एम.पी.एम.एल. पुणे (पिठासीन प्राधिकारी)** - उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असलेने **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

ठराव क्रमांक ०१ | विषय क्रमांक - ०१

दिनांक - १४/०९/२०१५ | विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

सही/-

**( अभिषेक कृष्णा )**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

पी.एम.पी.एम.एल. पुणे

पिठासिन प्राधिकारी

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

(विशेष सभा)

----------

(नवनिर्वाचित सभापती **मा.मासुळकर समीर मोरेश्वर** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक - ०२ | विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/०९/२०१५

सुचक : मा.जितेंद्र ननवरे | अनुमोदक : मा.जगदीश शेट्टी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १४/०९/२०१५

सुचक : मा.जावेद शेख अनुमोदक : मा.जगदीश शेट्टी

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या बुधवारी दुपारी २.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )

**सभापती**

मा.क्रीडा, कला, साहित्य

व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका


पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/६६२/२०१५

दिनांक : १४/०९/२०१५



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.